# यंत्रमाग विभागांच्या विविध योजनाची माहिती खालील प्रमाणे आहे.

## १. राष्ट्रीय सहकारी विकास निगम योजने अंतर्गत यंत्रमाग/गारमेंट/निटींग/प्रक्रिया सहकारी संस्थांना मंजूर अर्थसहाय्याची माहिती

राज्यातील यंत्रमाग उद्योग धंद्याच्या विकासाकरीता तसेच नविन यंत्रमागाच्या प्रकल्पाची उभारणी करून दर्जेदार उत्पादन करणे शक्य व्हावे म्हणुन राज्य शासनाने राष्ट्रीय सहकारी विकास निगम पुरस्कृत अर्थसहाय्य योजना राज्यात सन १९९५-९६ या आर्थिक वर्षापासुन अंमलात आणलेली आहे. सुधारीत आकृतीबंधानुसार दि. २२.१.२००९ च्या शासन निर्णयान्वये पुन्हा सुरू केलेली असून या योजने अंतर्गत राज्यातील यंत्रामाग/गारमेंट/निटींग/प्रक्रिया सहकारी संस्थांना अर्थसहाय्याचे स्वरूप १० टक्के स्व-भागभांडवल,४० टक्के राज्य शासनाचे भागभांडवल व ५० टक्के राज्य शासनाकडून कर्ज असे असून या योजनेची अंमलबजावणी शासन निर्णय दिनांक २४.२.१९९९ अन्वये निर्धारीत केलेल्या अटी व शर्तीनुसार करण्यात येत होती. शासन निर्णय दिनांक २६.०८.२०२४ अन्वये उपरोक्त योजना बंद करण्यात आली आहे.

## २. राज्य शासनाची यंत्रमाग सहकारी संस्थांना अर्थसहाय्य देण्याबाबतची नवीन योजना

राज्यातील यंत्रमाग संस्थांना अर्थसहाय्य करण्याची N.CDC योजना बंद करुन, त्याच धर्तीवर राज्य शासनाची यंत्रमाग सहकारी संस्थांना अर्थसहाय्य देण्याबाबतची नवीन योजना दि. २६.०८.२०२४ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली आहे. सदर योजना रा.स.वि.नि. यापूर्वी मंजूरी दिलेल्या परिशिष्ट “अ” मधील २६ तसेच यापूर्वी शासनास प्राप्त झालेले परिशिष्ट “ब” मधील ६७ प्रस्ताव व परिशिष्ट क मधील सन २००९ पूर्वी मंजूरी प्राप्त एक असे एकूण ९४ यंत्रमाग सहकारी संस्थांना राज्य शासनाकडून अर्थसहाय्य देण्यापूर्तीच मर्यादीत आहे. तद्नंतर सदर योजना बंद करण्यात येईल. **राज्याच्या नवीन योजनेचा आकृतीबंधानुसार खालील प्रमाणे आहे.**

| | | |
|---|---|---|
| सभासद भागभांडवल | - | १० % |
| शासकीय भागभांडवल | - | ४० % |
| शासकीय कर्ज | - | ५०% |
| एकूण | - | १०० % |

## ३. केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक वस्त्रोद्योग संकुल योजने अंतर्गत अर्थसहाय्य देण्याची योजना

जागतिक दर्जाच्या पायाभुत सुविधा वस्त्रोद्योग धंद्याकरीता उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने सन २००५-०६ या वर्षापासून एस.आय.टी.पी.(S.I.T.P.) योजनेअंतर्गत टेक्सटाईल्स पार्क उभारणीची योजना अंमलात आणलेली आहे. सदर योजना सार्वजनिक व खासगी तत्वावर आधारित आहे. तसेच प्रकल्पाची अंमलबजावणी व्यावसायिक एजन्सीव्दारे करण्यात येते. महाराष्ट्र राज्यामध्ये केंद्र शासनाने १६ टेक्सटाईल पार्कला मंजूरी दिली असून त्यापैकी ४ पार्क मान्याता केंद्र शासनाने रद्द केले आहेत.

सदर योजने अंतर्गत केंद्र शासन प्रकल्प किंमतीच्या ४० टक्के अथवा जास्तीत जास्त ४० कोटी पर्यंतचे ग्रॅन्ट/इक्विटी स्वरूपात अर्थसहाय्य मंजूर करण्याची तरतुद आहे.राज्य शासनाव्दारे प्रकल्प किंमतीच्या ९ टक्के किंवा ९.०० कोटी यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम भांडवली अनुदान म्हणुन देण्यात येते. प्रकल्पाची उर्वरीत रक्कम संस्थेनी स्वभांडवल/ कर्ज स्वरूपात स्वबळावर उभारणी करावयाची आहे. केंद्र शासनाकडून मंजूर करण्यात आलेल्या १२ टेक्सटाईल पार्क मध्ये विदर्भ -१, मराठवाडा -२, उत्तर महाराष्ट्र -३ व उर्वरीत महाराष्ट्र-६ चा समावेश आहे.

### ४. लघु-वस्त्रोद्योग संकुल (Mini Textile Park)

राज्यात लघु-वस्त्रोद्योग संकुल (Mini Textile Park) स्थापन करण्यास अनुदान देण्याबाबतची नवीन योजना शासन निर्णय दिनांक ०६.०३.२०२४ अन्वये सुरु करण्यात आली आहे. सदर योजने अंतर्गत राज्यातील निर्यात वाढीच्या दृष्टीने सर्व ६ महसूल विभागांमध्ये (प्रत्येक विभागात ३) असे १८ लघु-वस्त्रोद्योग संकुले उभारण्यात येतील.

**गुंतवणूकीचे निकष -**

- संकुलासाठी कमाल क्षेत्र १० एकर नवीन संकुले MIDC अखत्यारित जागेवर
- संकुलामध्ये सर्व प्रक्रियांसह वस्त्रोद्योग साखळीचा समावेश (जिनिंग प्रक्रिया ऐच्छिक)
- Effluent Treatment Plants (ETP), Zero Liquid Discharge (ZLD), Solar Plant, आरोग्य केंद्र आणि पाळणाघर अशा आवश्यक सुविधा
- प्रती संकुल स्थापना खर्च रु. १००-१२५ कोटी पर्यंत

**शासन अनुदान**

- प्रकल्प किंमतीवर होणा-या ४०% खर्चाची रक्कम किंवा रु.३० कोटी यापैकी जे कमी असेल तेवढे भांडवली अनुदान
- प्रकल्पात ५०% पेक्षा जास्त महिला कामगार असल्यास ४५% किंवा रु.३० कोटी यापैकी जे कमी असेल तेवढे भांडवली अनुदान
- वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ नुसार वीजदर व सौर उर्जा अनुदान
- ETP, ZLD and Steam Generation Plant स्थापनेकरीता अनुज्ञेय अनुदान

## वस्त्रोद्योग धोरण २०२३-२०२८ 'एकात्मिक श्वाश्वत व वस्त्रोद्योग धोरण (नवीन योजना)

### ५. कॅप्टिव्ह मार्केट योजना

. शासन निर्णय दिनांक १०/११/२०२३ अन्वये राज्यातील दारिद्रय रेषेखालील व अंत्योदय शिधापत्रिका धारक प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी एक मोफत साडी उपलब्ध करण्याची कॅप्टिव्ह मार्केट योजना सुरु केली आहे . सदर योजनेचा कालावधी सन २०२३-२०२८ या ५ वर्षासाठी निश्चित करण्यात आलेला आहे.

राज्यातील अंत्योदय शिधापत्रिका धारक असलेल्या कुटुंबाना या योजनेचा लाभा घेता येणार आहे. अंत्योदय शिधापत्रिका धारक प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी एक मोफत साडी कोणत्या सणाला वितरीत करावयाची बाबत शासन मान्यतेने निर्णय घेण्यात येईल. शासनाने निश्चित केलेल्या सणाच्या दिवसी अंत्योदय शिधापत्रिका धारक प्रतिकुटुंबाना दरवर्षी एक साडी मोफत वाटप करण्यात येईल. तसेच साड्यांचे वितरण राज्य शासनाच्या सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत करण्यात येईल लाभार्थींना रास्त भाव दुकानांमधुन साडी वितरीत करण्यात येणार आहे.

**नोडल संस्था** - सदर योजनेसाठी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या. नवी मुंबई यांना नोडल संस्था नेमण्यात आलेले आहे. महामंडळाने त्यांचेकडे नोंदणीकृत असलेल्या राज्यातील यंत्रमाग सहकारी संस्था/ सूक्ष्म,लघु,मध्यम उद्योग (M.S.M.E) अंतर्गत नोंदणीकृत यंत्रमाग घटक यांच्याकडून निर्धारित केलेले तांत्रिक निकष विचारात घेवून साडीचे उत्पादन कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

## ६. यंत्रमाग सहकारी संस्थासाठी भागभांडवल योजना

राज्याचे नवीन एकात्मिक व श्वाश्वत वस्त्रोद्योग धोरण सन 2023-2028 अंतर्गत राज्यातील यंत्रमागाच्या सहकारी संस्थांना झोन निहाय शासकीय भागभांडवल उपलब्ध करुन देण्याचे धोरण स्वीकारण्यात आलेले आहे. सदर धोरणांतर्गत सहकार क्षेत्रातील प्रकल्प उभारणी करण्याऱ्या यंत्रमाग सहकारी संस्थांनी वित्तीय संस्था कडून 50 टक्के कर्ज उपलब्ध करुन घ्यावे व यंत्रमाग प्रकल्प उभारणी करण्यात यावी. सहकारी यंत्रमाग क्षेत्राला देण्यात येणारे प्रोत्साहन झोननुसार वेगळे असेल.

**शासकीय भागभांडवल योजना**

- सहकारी यंत्रमागांचे सभासद भागभांडवल शासकीय भागभांडवल आणि वित्तीय संस्थांकडून मिळणारे कर्ज यांचे प्रमाण खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे झोननिहाय असेल. परंतु, यासाठी नवीन यंत्रमाग (साधे यंत्रमाग वगळता), विणकाम, प्रिपरेटरी, वार्पिंग, सायझिंग, कॉनिंग, ट्विस्टिंग, डबलिंग, टीएफओ आणि इतर युनिट्स अद्ययावत तंत्रज्ञानावर आधारित असणे आवश्यक राहील.

| **झोन** | **सभासद भागभांडवल** | **शासकीय भागभांडवल** | **वित्तीय संस्थांकडून कर्ज** |
|---|---|---|---|
| झोन १ | ५ | ४५ | ५० |
| झोन २ | १० | ४० | ५० |
| झोन ३ | १५ | ३५ | ५० |
| झोन ४ | २० | ३० | ५० |

**महत्वाचे:-** शासकीय भागभांडवलाचा लाभ घेणारे सहकारी यंत्रमाग संस्था भांडवली अनुदानास पात्र राहणार नाहीत.

**७. साध्या यंत्रामाग धारकांनी घेतलेल्या कर्जाचे ५ टक्के व्याज राज्य शासनाने ५ वर्षाकरीता अदा करणेबाबत**

राज्यातील साध्या यंत्रामाग धारकांनी त्यानी घेतलेल्या रू.१०८१.४४ लाख कर्जावरील व्याजात ५ टक्के सवलत अनुदान देण्याची राज्य शासनाने शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१६१/टेक्स-२ दि.५.१२.२०१७ अन्वये अंमलात आणली आहे.

शासन निर्णय दिनांक ३०.३.२०१९ अन्वये राज्यातील ८४ लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रू.४२.०१ लाख मंजूर करून **RTGS** व्दारे जमा करण्यात आले आहेत.